13:09:00

**रे.क्रि.केस नं. १८/ २०२२**

महाराष्ट्र शासन वि. संजय दादू खोत

**निशाण नं.३०/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – नामदेव तुकाराम खुटाळे

वय – ५३ वर्षे

धंदा – शेती

राहणार – खुटाळवाडी ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

१. पांडुरंग गणपती खुटाळे हे आमच्या भावकीतील असून मी त्यांना ओळखत होतो. मी आरोपीस ओळखतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. सदरची घटना कधी तसेच कोणत्या तारखेला घडली होती ते मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्या माहितीनुसार मला १२ वाजता कळाले. त्या दिवशी पांडुरंग खुटाळे दवाखान्यात आहेत असे मला समजले होते. मी घटनास्थळी गेलो नव्हतो, मी काहीही पाहिलेले नाही.

**(साक्षीदार सरकार पक्षास पूरक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२. मी अमित खुटाळे यांना ओळखतो, ते माझ्या भावकीतील आहेत. दि. १६.०४.२०२४ अमित व मी शेतीच्या कामांकरिता दुचाकीवरून कोल्हापूर येथे गेलो होतो किंवा कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी काम आटपल्यानंतर त्यांच्या गाडीवरून मी व ते

खुटाळवाडी येथे येत होतो.   हे म्हणणे खरे नाही की, अंदाजे सायंकाळी ०७.३० वाजता आम्ही पैजारवाडी गावच्या समोर आलो असता तेथे रोडवर गर्दी होती, त्यावेळी आम्ही गाडी थांबवून पाहिले असता, आमचे भाऊबंद पांडुरंग खुटाळे हे जखमी अवस्थेत रस्त्याच्याकडेला बसलेले दिसले, त्यांच्या बाजूला आरोपी बसलेला होता, आरोपीकडे विचारणा केली असता आरोपीने सांगितले की, त्याची मोटरसायकल  क्र. एम एच ४६ बी. एच ०५४८ ही घेवून तो व पांडुरंग खुटाळे पांडुरंग खुटाळे यांची सासरवाडी येथील आज्ञेसासुस पाहण्यास ते गेले होते व बोरपाडळे मार्गे खुटाळवाडी येथे असताना पैजारवाडीच्या थोडे पुढे आल्यानंतर त्याच्या गाडीवरील त्याचा ताबा सुटला आणि मोटरसायकलला ब्रेक मारल्यामुळे तो व पांडुरंग हे मोटरसायकलवरून खाली रस्त्यावर पडले, त्यावेळी आरोपीच्या डोकीस व डाव्या पायास खर्चटले व पांडुरंग यांच्या डोक्याला डाव्या बाजूस मुका मार लागून ते बेशुद्ध झाले, तेथे जमलेल्या लोकांनी १०८ अॅम्ब्युलन्स यांना फोन करून सदर पांडुरंग यांना लाइफलाईन हॉस्पीटल कोल्हापूर येथे दाखल केले. मी दवाखान्यात दुसऱ्या दिवशी गेलो होतो.  हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पांडुरंग खुटाळे शुद्धीवर आलेले नव्हते. त्यावेळी पांडुरंग यांच्या डोक्याचे ऑपरेशन केले होते किंवा कसे ते मला माहीत नाही.  हे म्हणणे खरे आहे की, पांडुरंग हे दवाखान्यात मयत झाले.  साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ती तारीख मला आठवत नाही. सदरचा अपघात हा आरोपी याच्या चुकीने झाला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आता मला दाखविण्यात आलेला अधोरेखित भाग अ  हा पोलिसांनी माझ्या जबाबात का लिहीला आहे त्याचे कारण मला सांगता येणार नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा आमच्या भावकीत लागतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या चांगल्या ओळखीचा आहे.  हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या चांगले ओळखीचे असल्यामुळे त्यांना शिक्षा व्हावी असे मला वाटत नाही.  हे म्हणणे खरे नाही की,  आरोपी हे माझ्या चांगल्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना शिक्षा व्हावी वाटत नसल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेमार्फत सुरु,</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या गावचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी साक्ष देण्याकरिता मला न्यायालयाकडून संमन्स प्राप्त झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आज न्यायालयात आल्यानंतर आरोपीला पाहिले त्यावेळी आरोपीच्या खटल्यात मला साक्ष द्यायची आहे असे समजून आले. पोलिसांनी माझ्या जबाबात काय लिहीले त्याबाबत मला माहिती नाही.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

13:26:12

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. ०१.०४.२०२६